# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: WWW.MSBNPE.ORG ई-मेल- ppasss2022@gmail.com ,मो. नं: ०२२ २२६११०१५

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of medical education and research, ४th floor, St. Georges hospital campus, p. d'melo road, fort, mumbai-४०० ००१

website: www.msbnpe.org e-mail- ppasss2022@gmail.com, mobile no- ०२२ २२६११०१५

क्र.मराशुवपशिमं/शिक्षण शुल्क मंजुरी/२०२२-२३/7514 /२०२३ दिनांक-02 /०३/२०२३

<u>परिपत्रक</u>

प्रति,

प्राचार्य / संस्थाप्रमुख,

सर्व संलग्नित ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्था.

**विषय :** शै.व. २०२१-२२ साठी ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाकरीता शुल्क नियामक प्राधिकरण यांनी मंजूर केलेल्या शिक्षण शुल्कास शै.व. २०२२-२३ करीता मंजुर करण्याबाबत.

**संदर्भ :** १. शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे यांचे दि. ३० नोव्हेंबर २०२१ रोजीचे परिपत्रक.

२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१, दिनांक. १३.१२.२०२२.

३. क्र. मराशुवपशिमं/शिक्षण शुल्क समिती/इतिवृत्त/६८७१/२०२३, दि. १८/०१/२०२३.

४. क्र. मराशुवपशिमं/शिक्षण शुल्क/२०२२-२३/६८७५/२०२३, दि. १९/०१/२०२३.

५. क्र. मराशुवपशिमं/शिक्षण शुल्क समिती/बैठकीचे इतिवृत्त क्र. ०३/७३६२/२०२३, दि. २१/०२/२०२३.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये मंडळाशी संलग्नीत ए.एन.एम. व जी.एन.एम. संस्थांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ नुसार ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्याबाबतचा शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत निर्गमित करण्यात आला आहे. शासन निर्णयामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ साठी शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी निश्चीत केलेल्या शुल्काप्रमाणे सन २०२२-२३ साठी शुल्क संरचना असावी व सन २०२२-२३ साठी नव्याने मान्यता दिलेल्या ए.एन.एम., जी.एन.एम., व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची शुल्क निश्चिती नवनियुक्त समितीद्वारे करण्याबाबतचे नमुद करण्यात आले आहे.

त्यानुसार आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीच्या बैठकीमध्ये मंजुर झालेल्या ठरावानुसार शुल्क नियामक प्राधिकरण यांनी संदर्भ क्र. १ नुसार शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२, ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकरीता मंजुर केलेले शुल्क तसेच शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ साठी Adhoc शुल्कास मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. ५ नूसार शुल्क निश्चिती करण्यासाठी समितीमार्फत केलेल्या कार्यवाहीकरीता प्रक्रिया शुल्क रु. ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार रुपये फक्त) निर्धारीत करण्यात आलेले आहे. सदर शुल्क भरणे सर्व संस्थांना बंधनकारक असून बँक खाते क्रमांकाबाबत परिपत्रक यथावकाश मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. शै.व. २०२३-२४ पासून शिक्षण शुल्क मंजुरी करीता शासन निर्णय मध्ये नमूद केलेले शुल्क रु. १५,०००/- आकारण्यात येईल.

खालील कागदपत्रे टपालाव्दारे / हस्तबटवड्याव्दारे तसेच ई-मेल (ppasss2022@gmail.com) मार्फत तात्काळ मंडळास सादर करण्यात यावीत. सदर कागदपत्रे मंडळास प्राप्त झाल्यानंतर व शुल्क निश्चिती प्रक्रिया शुल्क रु. ५०००/- रकमेच्या अधीन राहून शुल्कास मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल, सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास सर्वस्वी संस्थेची जबाबदारी राहील. याची नोंद घ्यावी.

१. शै.व. २०२१-२२ करीता देण्यात आलेले संलग्नता पत्र.
२. संस्था मंजुरी शासन निर्णय /Essentiality Certificate.
३. कार्यरत शिक्षकांची यादी.
४. A.Y. २०२२-२३ Students Enrollment list.

संचालक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

तथा शिक्षण शुल्क समिती,सदस्य